पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ५८७ दिनांक - २९/०७/२०२३**

सिंहगड पोलिस स्टेशन पुणे शहर

## मोक्यातील फरार आरोपीस तब्बल आठ महीन्यानंतर सिंहगडरोड पोलीसांनी शिताफीने पकडुन केली अटक

सिंहगडरोड पोलीस स्टेशन् गुन्हा रजि.न.४८३/२०२२ भा.दं.वि.क.३०७,५०४,५०६(२),३४ आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३)/१३५ सह क्रिमिनल अमेंडमेट ॲक्ट कलम ७, महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे क.३(१)(ii),३(२) व ३(४) मधील पाहिजे आरोपी नामे **आकाश सुभाष गाडे रा.रामनगर सिंहगडरोड पुणे** हा आठ महीन्यापासुन फरार असुन त्याचा शोध तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार हे घेत होते.

दि.२७/०७/२०२३ रोजी पाहिजे फरारी आरोपी यांचा शोध घेत असताना **पोलीस अंमलदार देवा चव्हाण व सागर शेडगे** यांना त्याचे गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, पाहीजे आरोपी आकाश सुभाष गाडे रा.रामनगर सिंहगडरोड पुणे हा भुमकर चौकाजवळ स्वामी नारायण मंदिर जवळ न-हे पुणे येथे थांबलेला आहे.अशी खाञीशीर बातमी मिळाल्याने सदरची बातमी ही वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.अभय महाजन,यांना कळविली असता त्यांनी सदर ठिकाणी जावुन खाञी करुन पुढील योग्य ते कारवाई करण्याचे आदेश दिल्याने लागलीच तपास पथक प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री सचिन निकम व त्यांचा पोलीस स्टाफ सदर मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा लावुन दाखल गुन्ह्यातील पाहीजे आरोपी आकाश सुभाष गाडे हा मिळुन येताच त्यास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्यांने त्याचे नाव **आकाश सुभाष गाडे वय- २५ वर्षे रा. रामनगर राम मंदिर जवळ सिंहगडरोड पुणे** असे सांगितले, त्याचेकडे दाखल गुन्हयाबाबत अधिक तपास केला असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यास दि.२७/०७/२०२३ रोजी दाखल गुन्ह्याचे तपास कामी अटक करुन त्यास पुढील कारवाई कामी मा.श्री.राजेंद्र गलांडे,सहायक पोलीस आयुक्त,सिंहगडरोड विभाग पुणे शहर यांचे समक्ष हजर केले असुन पुढील अधिक तपास मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,सिंहगडरोड विभाग पुणे शहर.श्री.राजेंद्र गलांडे, हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप-आयुक्त,परि-३ पुणे शहर श्री.सुहेल शर्मा,मा.सहायक पोलीस आयुक्त,सिंहगडरोड विभाग पुणे शहर.श्री.राजेंद्र गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अभय महाजन,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.जयंत राजुरकर,सहा.पोलीस निरीक्षक, सचिन निकम,गणेश मोकाशी पोलीस उपनिरीक्षक श्री.आबा उत्तेकर,सहा.पोलीस फौजदार,पोलीस अंमलदार,संजय शिंदे,विकास पांडुळे, विकास बांदल,देवा चव्हाण,सागर शेडगे, शिवाजी क्षीरसागर, राहुल ओलेकर, स्वप्नील मगर, दक्ष पाटील, अमोल पाटील,राजु वेंगरे,अविनाश कोंडे यांनी केली आहे.


सिंहगड रोड पोलीस स्टेशन पुणे शहर
सिंहगड रोड पोलीस स्टेशन
पुणे शहर